सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

( महाराष्ट्र पोलीस राजपत्र, विभागीय भाग - ६अ करिता )

क्रमांक: DGP-D८A०२८/२५/२०२४-DESK ८A मुंबई, दि. २२/०५/२०२५

-: आदेश :-

पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या मुफसल संवर्गातील खालील नमूद उच्च श्रेणी लघुलेखक यांना स्वीय सहायक (राजपत्रित, गट-ब) या पदावर कार्यभार स्विकारल्याच्या दिनांकापासून निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात पदोन्नती देण्यात येत असुन, पदोन्नतीवर त्यांची पदस्थापना त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या कार्यालयामध्ये करण्यात येत आहे.

| अ.क्र | उच्च श्रेणी लघुलेखकाचे नाव | सध्याच्या नियुक्तीचे कार्यालय | पदस्थापनेवरील कार्यालय |
|---|---|---|---|
| १. | श्री. गणेश रघुनाथ मोरे | संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक | विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, नागपूर |

२. उपरोक्त पदोन्नती ही विशेष अनुमती याचिका क्रमांक २८३०६/२०१७ या प्रकरणात मा.सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायनिर्णय व आदेश यांच्या अधिन राहुन देण्यात येत आहे.

३. उपरोक्त पदोन्नती ही शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. बीसीसी-२०१८/प्र.क्र. ३६६/१६-ब, दि. ०७.०५.२०२१ यास आव्हान देण्यात आलेल्या प्रकरणात मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या न्यायनिर्णयाच्या अधिन राहुन देण्यात येत आहे.

४. उपरोक्त पदोन्नती ही निव्वळ तात्पुरत्या स्वरूपाची असल्याने या तात्पुरत्या पदोन्नतीमुळे संबंधित अधिकारी यांना नियमाधिनतेचा (Regularization) व सेवाजेष्ठतेचा (Seniority) कोणताही हक्क असणार नाही.

रश्मि शुक्ला
पोलीस महासंचालक,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रति,

संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक
विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, नागपूर

२. उपरोक्त नमूद उच्च श्रेणी लघुलेखक यांना आता निलंबित केले असेल, किंवा त्यांच्याविरूध्द नव्याने विभागीय चौकशी प्रलंबित असेल, किंवा न्यायालयात खटला चालू असेल, किंवा न्यायालयाने दिलेल्या निर्णयाविरूध्द वरिष्ठ न्यायालयात अपिल प्रलंबित असेल, किंवा जर ते एखादी शिक्षा भोगत असतील व ती शिक्षा या निवडसूची वर्ष २०२४-२५ मध्ये संपुष्टात आली नसेल तर पदोन्नतीवर न सोडता सविस्तर अहवाल पोलीस महासंचालक कार्यालयास पाठवावा व पुढील आदेशाची वाट पाहावी.

३. उपरोक्त नमूद उच्च श्रेणी लघुलेखक यांचेविरूध्द कोणतीही कार्यवाही प्रलंबित नसेल तर त्यांना पर्यायी उच्च श्रेणी लघुलेखकाची वाट न पाहता पदोन्नतीवर नविन नियुक्तीच्या ठिकाणी तात्काळ कार्यमुक्त करावे. तसेच त्यांना कार्यमुक्त केल्याचा व पदोन्नतीच्या ठिकाणी हजर झाल्याचा दिनांक सत्वर या कार्यालयास कळवावा.

४. घटक प्रमुखांनी संबंधित उच्च श्रेणी लघुलेखक यांना विनाविलंब कार्यमुक्त न केल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित घटक प्रमुखांची राहील.

५. शासन निर्णय, वित्त विभाग क्र. पीऐचवाय १०८२/सीआर ११००(२)/एसईआर-३, दि.०६.११.१९८४ अन्वये पदोन्नतीनंतर कनिष्ठ पदावर वेतनवाढ दिल्यानंतर वेतननिश्चिती बाबत विकल्प द्यावयाचा असेल, तर तो पदोन्नतीवर हजर झालेल्या दिनांकापासून ०१ महिन्याचे आत द्यावा. अशा प्रकारचा विकल्प न दिल्यास पदोन्नती पदावरील वेतननिश्चिती म.ना.से. (वेतन) नियम, ११ (१) (अ) अन्वये केली जाईल याची उपरोक्त उच्च श्रेणी लघुलेखक यांनी नोंद घ्यावी.

६. उपरोक्त नमूद उच्च श्रेणी लघुलेखक हे पदोन्नतीवर जाण्यास इच्छुक नसतील तर त्यांनी तसा अर्ज ०७ दिवसाच्या आत घटक प्रमुखांचे मार्फत ह्या कार्यालयास सादर करावा.

७. पदोन्नती झालेल्या उच्च श्रेणी लघुलेखक यांचे हार्दीक अभिनंदन.

( कृष्ण प्रकाश )
अपर पोलीस महासंचालक (प्रशासन) (अति. कार्य.)
महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत कार्यवाहीसाठी,

पोलीस उप अधीक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक कार्यालय, मुंबई.
२. सदरचे आदेश कृपया पोलीस महासंचालकांच्या संकेत स्थळावर ०१ महिन्यासाठी उपलब्ध करून देण्यात यावेत.

प्रत,

कार्यासन अधिकारी, कार्यासन क्रमांक १० / १२ / ३६